रयत शिक्षण संस्थेचे

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

ता.आंबेगाव जि.पुणे

मराठी विभाग

वार्षिक अहवाल 2022-23

महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत सन 2022-23 मध्ये खलील प्रमाणे विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

०१. मराठी विभाग व राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद,पुणे यांच्या संयुक्त विध्यमाने दि. ०९ ऑगस्ट २०२२ रोजी ९ वे विद्यार्थी व शिक्षक साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, पुणेचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रकाश रोकडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे व इतर मान्यवर व शिक्षक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हे एक दिवशीय साहित्य संमेलन संपन्न झाले.

०२. **'पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंती निमित्त १३ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२२ या कलावधीत विविधस्पर्धांचे** आयोजन यशस्वीरीत्या करण्यात केले. या जयंती निमित्ताने महाविद्यालायत प्रश्न मंजूषा, चित्रकला, काव्यलेखन, निबंधलेखन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

०३. दि. १५.१०.२०२२ रोजी मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विध्यमाने आयोजित भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम प्रसंगी मायबोली वाचनालय, डेगावच्या संस्थापिका श्रीमती हिराबाई काळे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

०४. लेखक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत 'भारतातील बहुविविधता आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर' बाल साहित्यिक रमेश तांबे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

०५. मराठी विभागांतर्गत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा "**दि .१४ जानेवारी २०२३ ते २८ जानेवारी २०२३ या काळात साजरा करण्यात आलाया कालावधीमध्ये विभागाद्वारे विविध .

कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आलेयानिमित्ताने महाविद्यालया .त पुढील स्पर्धांचे आयोजन केले होते.

अ.क्र.	स्पर्धेचे नाव	सहभागी विद्यार्थी
१.	काव्यलेखन स्पर्धा	३७
२.	निबंधलेखन स्पर्धा (निबंधाचे विषय खालीलप्रमाणे)	५२
३.	प्रश्न मंजुषा) Online(	३४५
४.	भाषा संवर्धन विशेष व्याख्यान	११५

०६. कविवर्य वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दिनांक २७ फेब्रुवारी **"मराठी भाषा गौरव दिन"** म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून **श्री साहेबराव शिंदे .व श्री बाळासाहेब कानडे** उपस्थित होते. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

०७. मराठी विभागांतर्गत 'उन्मेष' भितीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. या भित्तिपत्रकाच्या माध्यमातून मराठी विभागतील विद्यार्थी व इतर विभागातील विद्यार्थ्यानी आपले स्व लिखित साहित्य प्रकाशित केले.

०८. मराठी विभागातील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यानी क्षेत्रीय अभ्यास भेट अंतर्गत चांडोली येथील बेलदत्तवादी येथील महानुभाव मठास भेट देऊन महानुभाव संप्रदायातील साहित्य अभ्यासले. त्यावर आधारित प्रकल्प विभागास सादर केले.

०९. मराठी विभागातील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यानी क्षेत्रीय अभ्यास भेट अंतर्गत मंचर येथील प्रिंट मिडिया कार्यालयास भेट देऊन श्री संतोष वळसे यांच्या कार्यालयास भेट देऊन प्रिंट मिडिया संदर्भातील माहिती घेतली व प्रिंट मिडियातील प्रत्यक्ष मराठी भाषेचे उपयोजन यासंदर्भात माहिती घेतली. या भेट प्रसंगी पत्रकार श्री संतोष वळसे यांचे मार्गदर्शन लाभले.

वरील सर्व उपक्रम व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रो. डॉ.गार्डी बी.पी.,प्रा.मुठे आर.पी. ,प्रा.मुंढे जी. डी. व डॉ.रूपनर एस.एस. यांचे सहकार्य लाभले व या उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.जी.कानडे यांचे मार्गदर्शन लाभले.